CMYK



दैनिक
# आपला विदर्भ

वक्रतुंड महाकाय
सूर्यकोटि समप्रभ
निर्विघ्नं कुरु मे देव
सर्वकार्येषु सर्वदा
सर्वांना गणेश चतुर्थीच्या
हार्दिक शुभेच्छा

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 31 ■ शनिवार, दि. 07 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# श्री गणरायाचे आगमन आनंद, समृद्धी, समाधानाचे पर्व घेऊन येवो - मुख्यमंत्री

## श्री गणेश आगमनाच्या पूर्वसंध्येला शुभेच्छा, पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** श्री गणरायाचे आगमन राज्याच्या विकास चक्राला गती देण्यासाठी राबणाऱ्या प्रत्येकासाठी, शेतकरी, कष्टकरी, कामगार बांधवासाठी राज्यातील माता-भगिनींसाठी, आबाल-ज्येष्ठांसाठी आनंदाचे, आरोग्यदायी, समृद्धीचे, समाधानाचे पर्व घेऊन येवो, अशी प्रार्थना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. श्री गणेश आगमनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यातील नागरिकांसह, जगभरातील तमाम गणेश भक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. श्री गणेशांचे अखंड कृपाछत्र महाराष्ट्रावर राहावे, अशी मनोकामनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी बाप्पा चरणी केली आहे.

शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणतात की, श्री गणेशाचे आगमन दरवर्षी एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येते. यातून मंगलमय, पवित्र वातावरण निर्माण होते. गणेशोत्सवातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडते. म्हणून जगाचेही महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. श्री गणेशाला कलाधिपती मानले जाते. त्यामुळे या उत्सव काळात कलाविष्कारालाही उधाण येतं. महाराष्ट्राचा काना कोपरा अशा अविष्कारांनी, उत्साह-जोश यांनी ओसंडून जातो. यंदाही आपण हा उत्सव उत्साहात, जल्लोषात आणि पावित्र्य राखून साजरा करूया. श्री गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक




बांधिलकीची जाणीव ठेऊया. उत्सव ही संधी मानून आपण समाजातील गरजूंपर्यंत पोहचून, त्यांच्यापर्यंत शिक्षण, आरोग्य तसेच अशा विविध प्रकारच्या सेवा, मदत पोहचवण्याचा प्रयत्न करूया.

श्रीगणेश आपल्याला निसर्ग पूजनाचा संदेश देतात. आपणही पर्यावरणाची काळजी घेऊया. निसर्ग संवर्धनाच्या उपक्रमांना पाठबळ देऊया. निसर्गाचं जतन-संवर्धन होईल, अशा प्रयत्नांत सहभागी होऊया.

सामाजिक सलोखा हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. त्यामुळे श्री गणेशाकडून सकारात्मक ऊर्जा, प्रेरणा घेऊन राज्यातील सामाजिक सलोखा-बंधुभाव परस्परांतील प्रेम-आदर भाव वाढीस लागेल, असे प्रयत्न करुया.

आपला महाराष्ट्र भारताचे 'ग्रोथ इंजिन' आहेच. श्रीगणेशाच्या कृपेनं आपला महाराष्ट्र विकसित भारताचेही नेतृत्व करेल, यासाठी एकजुटीने प्रयत्न करूया. श्री गणरायाचे आगमन महाराष्ट्रातील घरा-घरात सुख, समृद्धी घेऊन येईल. कुटुंबातील सगळ्यांच्या इच्छा-आशा-आकांक्षा पूर्ण करेल. विघ्नहर्त्याचं आगमन निसर्गाची अवकृपा, आणि अन्य सगळी विघ्न दूर करेल. श्री गणेशाचं अखंड कृपाछत्र कृपाछत्र महाराष्ट्रावर राहावे,अशी मनोकामना करून, मुख्यमंत्र्यांनी राज्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## उद्धव ठाकरेंना म्हटलं होतं दोन तासांत आमदार परत आणतो; पण, शिवसेना शिंदे गटाच्या नेत्याचं मोठं विधान

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला जोरदार सुरुवात केली आहे. सर्वच पक्षांच्या नेत्यांचे सध्या राज्यभरात दौरे सुरु आहेत. एकीकडे महायुतीचे नेते ठिकठिकाणी मेळावे घेत आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीच्या नेत्यांचेही दौरे आणि सभा सुरु असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यातच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. असं असतानाच आता शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी मोठं विधान केलं आहे. ''शिवसेनेचे आमदार गुवाहाटीला गेले होते तेव्हा मला उद्धव ठाकरेंनी फोन केला होता. त्यावेळी मी त्यांना सांगितलं होतं की तुम्ही काँग्रेसची साथ सोडा. मी दोन तासांत आमदारांना परत 'मातोश्री'वर आणतो. पण उद्धव ठाकरेंनी ऐकलं नाही'', असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. ते दापोलीतील एका कार्यक्रमात बोलत होते.

रामदास कदम काय म्हणाले?

''शिवसेनेचे आमदार ज्यावेळी गुवाहाटीला गेले होते. त्यावेळी मला उद्धव ठाकरेंनी फोन केला होता. त्यावेळी मी त्यांना म्हटलं होतं की, अजूनही वेळ गेलेली नाही. तुम्ही काँग्रेसची साथ सोडा आणि संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत पत्रकार परिषद घ्या आणि सांगा. त्यानंतर गुवाहाटीला गेलेल्या सर्व आमदारांना खासगी विमानाने दोन तासांत 'मातोश्री'वर नाही आणलं तर माझं नाव रामदास कदम नाही. उद्या गणपती बसणार आहेत, मी गणपतीची शपथ घेऊन सांगतोय हे शंभर टक्के खरं आहे. मग त्यानंतर उद्धव ठाकरे मला म्हणाले हो मी तुम्हाला फोन लावून सांगतो.

# राज्यात सव्वा दोन वर्षांत ३.१४ लाख कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## देशातील एकूण गुंतवणुकीपैकी तब्बल ५२.४६ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील एकूण परकीय गुंतवणुकीची एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीची आकडेवारी समोर आली असून देशात झालेल्या एकूण गुंतवणुकीपैकी तब्बल ५२.४६ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली असून राज्याने परकीय गुंतवणुकीत आपले अव्वल स्थान कायम राखले असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यातील एकूण परकीय गुंतवणुकीबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात २०१४ ते २०१९ या काळात सत्तेत असताना एकूण ३ लाख ६२ हजार १६१ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली होती. आता सव्वा दोन वर्षांत ३ लाख १४ हजार ३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक शासनाने राज्यात आणली. दुसऱ्या तिमाहीची आकडेवारी अजून बाकी असल्याने एकूण गुंतवणुकीचा आकडा आणखी वाढणार आहे.



उद्योगस्नेही धोरणामुळे राज्य गेले दोन वर्षे सातत्याने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात क्रमांक एकवर राहिले आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सुद्धा राज्यात सर्वाधिक गुंतवणूक आली आहे. एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत देशात आलेली एकूण गुंतवणूक ही १ लाख ३४ हजार ९५९ कोटी रुपये इतकी असून, त्यापैकी ७० हजार ७९५ कोटी अर्थात ५२.४६ टक्के गुंतवणूक राज्यात आली आहे. कर्नाटक, दिल्ली, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, हरयाणा, उत्तरप्रदेश व राजस्थान या राज्यांमध्ये झालेल्या गुंतवणुकीच्या एकत्रित बेरजेपेक्षाही अधिक गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. राज्यात २०२२-२३ मध्ये १ लाख १८ हजार ४२२ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आली होती जी कर्नाटक, दिल्ली, गुजरात यांच्या एकत्रित बेरजेपेक्षा अधिक होती, २०२३-२४ मध्ये १ लाख २५ हजार १०१ कोटी रुपये गुंतवणूक राज्यात आली होती जी गुजरातपेक्षा दुपटीहून अधिक आणि गुजरात व कर्नाटक यांच्या एकत्रित बेरजेहून अधिक होती.

**एप्रिल ते जून २०२४ या तिमाहीत राज्यांमध्ये झालेली गुंतवणूक**

पहिला क्रमांक महाराष्ट्र (७०,७९५ कोटी), दुसरा कर्नाटक (१९,०५९ कोटी), तिसरा दिल्ली (१०,७८८ कोटी), चौथा तेलंगणा (९०२३ कोटी), पाचवा गुजरात (८५०८ कोटी), सहावा तामिळनाडू (८३२५ कोटी), सातवा हरियाणा (५८१८ कोटी), आठवा उत्तरप्रदेश (३७० कोटी), नववा राजस्थान (३११ कोटी) याप्रमाणे आहे.

## स्वर्गीय मासाहेब मीनाताई ठाकरे यांना उपसभापती विधान परिषद व शिवसेना नेत्या नीलम ताई गोऱ्हे यांनी केले अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील नव्हे तर जगभरातील तमाम शिवसैनिकांच्या श्रध्दास्थानी असलेल्या स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतिदिना निमित्त ०६ सप्टेंबर रोजी विधान परिषद उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. पुणे शहरातील शिवसैनिकांनी आपल्या माँसाहेबांना आदरांजली वाहिली या प्रसंगी सुदर्शना त्रिगुणित संपर्क प्रमुख,निलेश गिरमे युवा सेना शहर प्रमुख व सुधीर जोशी यांनी संयोजन केले तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.




# हिंदू-मुस्लिम वादाची साक्ष आणि ऐक्याच प्रतीक असलेला धुळ्यातील खुनी गणपती

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** खुनी गणपती नांव ऐकून आश्चर्य वाटलं नं ? पण हा धुळ्यातला मानाचा गणपती आहे.! धुळ्यातील खुनी गणपतीची - खुनी मशिदीजवळ होते ती ऐतिहासिक महत्व असलेली महापूजा.

१८९५ मध्ये खांबेटे गुरुजींनी टिळकांच्या प्रेरणेने धुळ्यात सार्वजनीक गणेशोत्सव सुरु केला. त्या गणेशाची विसर्जन मिरवणूक १००० वर्ष जून्या शाही जामा मशिदीवरुन सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी पालखीतून जात होती. त्यावेळी या पालखीला विरोध झाला आणि या विरोधाच रुपांतर हाणामारीत झाल्यानं ब्रिटीशांनी गोळीबार केला. त्यात बरेच लोक मृत्यूमुखी पडले,अनेक जखमी झाले आणि आहिराणीत त्या मशिदजवळ खून पडनात, खुन नी मसिद, गणपतीना वकतले तथा खून पडनात... या चर्चांमूळे मशिदीला खुनी मशिद आणि गणपतीला खुनी गणपती नांव प्रचलीत झालं. त्यावेळी तणाव निर्माण झाल्याने तब्बल ५ दिवस गणपती त्या मशिदीसमोर होता.

पुढे ब्रिटीशांनी दोन्ही गटात समेट घडवला आणि एकमेकांच्या धर्माच्या सन्मानासाठी ठोस पाऊल उचललं. ब्रिटीशांकडून २२८ रुपये दोन्ही गटांना दिले गेले आणि त्यातून ही ऐतिहासिक प्रथा सुरु झाली.

दर अनंत चर्तुदशीला गणपतीची विसर्जन मिरवणूक पालखीतूनच निघते. यावेळी पारंपारीक टाळ-मृदुंगाच्या गजरात तिनपावली, बारापावली नृत्य होत, बरोबर सायंकाळी ५ वाजता, म्हणजेच नमाजची अजान होतांना खुनी गणपतीची पालखी मशिदीच्या दाराच्या






एकदम समोर येते, मशिदीतून गणपतीवर पुष्पवृष्टी केली जाते. मशिदीतूनच एक धर्माधिकारी येतो, तिथूनच आरतीचं तबक आणि गुलाबाच्या फुलांचा हार आणून मशिदीतर्फे गणपतीची आरती केली जाते.एकीकडे आरती आणि दुसरीकडे अजान सुरु होते. तिथे आरती झाली की गणपती विसर्जनासाठी मार्गस्थ होतो.

या ठिकाणी आल्यानंतर पालखी अचानक जड होत असल्याचाही अनुभव भाविक सांगतात. हिंदू मुस्लीम ऐक्याची सुंदर परंपरा इथे आहे. आणि दोन्ही धर्मीयांनी ती आजतागायत जपलीय.

आठ-दहा लाख लोकसंख्या असलेल्या धुळे महानगरात जुने धुळे सोडलं तर बाप्पाचं हे आगळं रुप जास्त कुणाला माहित नाही. जुन्या धुळ्यातल्या जुन्या लोकांनी ही प्रथा जपलीय. त्यामूळे या इतिहास आणि वेगळेपणाचा इव्हेंट होण्यापासून वाचलाय. जसं १८९५-१८९६ मध्ये होतं तसंच तंतोतंत आजही पाळलं जातंय. धुळ्यात आल्यानंतर, जुने धुळे विचारलं की खुनी मशिद हाच बसथांबा आजही आहे. जसं मशिदीच्या प्रशासनाने गणपती जपलाय, तस जुन्या धुळ्याने हिंदूबहूल कॉलनीतली / पेठेतली लोकांनी मशिद पावित्र्याने जपलीय.

CMYK

## आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज जयंती. मात्र आज त्यांची जयंती असूनही त्यांची जयंती साजरी करावी असे कोणालाही वाटत नाही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म आजच्याच दिवशी ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. १८३० साली इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्याने पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उतरेली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या जयंतीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# अखेर... त्या लाईनमनची बदली थांबविली

## खेट्री शिरपूर, ग्रामस्थांच्या प्रयत्नाला यश

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** पातुर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्राचे कनिष्ठ अभियंता गौरव निकुंबे यांच्या हलगर्जीपणा व चुकीच्या अहवालामुळे काही महिन्यापूर्वी नियुक्त झालेले लाईनमन संजय खडसे यांची महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बदली केल्याने खेट्री शिरपूर येथील ग्रामस्थ आक्रमक झाले होते. आणि महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रतीक्षा अजय शंभरकर यांच्या कार्यालयावर १३ ऑगस्ट रोजी धाव घेऊन लाईनमनची बदली थांबवा अन्यथा शेकडोच्या संख्येने महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

**दैनिक आपला विदर्भ IMPACT**

याबाबतचे वृत्त दैनिक आपला विदर्भ ने प्रकाशित करताच संबंधित महावितरण विभाग खडबडून जागा झाला आणि महावितरणच्या अधीक्षक अभियंता यांनी ५ सप्टेंबर रोजी लाईनमन संजय खडसे यांची बदली थांबविल्याचे आदेश पारित केले आहे. त्यामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.



लाईनमनची बदलीमुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडित

शेकडो ग्रामस्थांची आमदार नितीन देशमुखकडे धाव

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

पातूर : पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्र अंतर्गत खेट्री शिरपूर चांगेफळ येथे कार्यरत असलेले लाईनमन संजय खडसे यांची गेल्या काही दिवसापूर्वी बदली झाल्याने वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने संतप्त झालेल्या शेकडो ग्रामस्थांनी मंगळवारी दि.२० ऑगस्ट रोजी बाळापुर मतदार संघाचे आमदार नितीन देशमुख यांच्याकडे धाव घेऊन लाईनमनची बदली थांबविण्याची मागणी केली, आमदार नितीन देशमुख यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून बदली थांबविण्याचे सांगितले, लाईनमन संजय खडसे यांची कनिष्ठ अभियंता यांच्या अहवालावरून महावितरण विभागाने नुकतेच बदली केली, मात्र संजय खडसे हे २४ तास विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सतर्क असतात, त्यांच्याविरुद्ध खेट्री शिरपूर चांगेफळ या तीन गावातील ग्रामस्थांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रतीक्षाअजय शंभरकर यांच्याकडे १३ ऑगस्ट रोजी धाव घेऊन बदली थांबविण्याची मागणी केली होती. परंतु अद्यापही दखल न घेतल्याने, आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी मंगळवारी आमदार नितीन देशमुख यांच्याकडे धाव घेऊन लाईनमनची बदली थांबविण्याची मागणी केली.

कनिष्ठ अभियंताची आमदाराकडून कानउघाडणी लाईनमनची बदली रद्द करण्यासाठी ग्रामस्थांनी महावितरणाकडे निवेदन दिले होते.परंतु अद्यापही दखल न घेतल्याने संतप्त झालेल्या शेकडो ग्रामस्थांनी मंगळवारी आमदार नितीन देशमुख यांच्याकडे धाव घेऊन कनिष्ठ अभियंता गौरव निकुंबे यांच्या चुकीच्या अहवालावरून लाईनमनची बदली झाली असून,ते रद्द करण्याची मागणी केली. ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत आमदार नितीन देशमुख यांनी कनिष्ठ अभियंता यांची फोनवर कान उघाडणी केली आहे.

कनिष्ठ अभियंता यांच्या चुकीच्या धोरणात्मकमुळे लाईनमन संजय खडसे यांची बदली झाल्याने वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत आहे. बदली रद्द करण्यासाठी महावितरणाकडे निवेदन दिले, मंगळवारी आमदाराकडे सुद्धा निवेदन दिले, बदली रद्द न झाल्यास शेकडोच्या संख्येने महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल बाबर खान सामाजिक कार्यकर्ते शिरपूर

# 'मुख्यमंत्री योजनादूत' : शासनाच्या योजनांची प्रचार व प्रसिद्धी - मनोज सुमन शिवाजी सानप

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे ''मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना'' राबविण्यास दि. ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिध्दी करणे व त्यांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ पोहोचविण्यासाठी ५० हजार ''योजनादूत'' नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे.

''योजनादूत'' कार्यक्रमाच्या अंमलबजावणी बाबतची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावर सोपविण्यात आली आहे. नेमणूक केलेल्या योजनादूतांचे म ानधन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून देण्यात येणार आहे. तसेच योजनादूतांच्या निवडीचे निकष, अटी व शर्ती तयार करण्याबाबतची कार्यवाही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने ''मुख्यमंत्री योजनादूत'' कार्यक्रम ाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिध्दी करणे व त्यांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने त्यांना सहाय्य करण्यासाठी ५० हजार योजनादूत निवडण्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून ''मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम'' सुरु करण्यास शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे.

याबाबतची कार्यपध्दती पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे ''मुख्यमंत्री योजनादूत'' कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जाणार आहेत.

ग्रामीण भागात प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी १ व शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १० हजार प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येणार आहे. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित)

निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत ६ महिन्यांचा करार केला जाणार असून हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

मुख्यमंत्री योजनादूताच्या निवडीसाठी पात्रतेचे निकष :-

- वयोमर्यादा १८ ते ३५ वयोगटातील उमेदवार.
- शैक्षणिक अर्हता- कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर.
- संगणक ज्ञान आवश्यक.
- उमेदवाराकडे अदययावत म ोबाईल असणे आवश्यक.
- उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असणे आवश्यक.
- उमेदवारांचे आधार कार्ड असावे व त्याच्या नावाचे बँक खाते आधार संलग्न असावे.

योजनादूत निवडीसाठी उमेदवाराने सादर करावयाची कागदपत्रे:-

- विहित नमुन्यातील ''मुख्यमंत्री योजनादूत'' कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज.
- आधार कार्ड.
- पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे प्रमाणपत्र इ.
- अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला)
- वैयक्तिक बँक खात्याचा तपशिल.
- पासपोर्ट आकाराचा फोटो.
- हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील)

मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक प्रक्रिया:-

- उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या बाह्यसंस्थांमार्फत संपूर्णत: ऑनलाईनरित्या पूर्ण करण्यात येईल.
- ही छाननी नमूद केलेल्या पात्रतेच्या निकषानुसार करण्यात येईल.
- ऑनलाईनरित्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उम ेदवारांची यादी राज्यातील प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल.
- जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने, प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील (यामध्ये उमेदवारांची शैक्षणिक व वयोमर्यादेविषयक मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील). त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर ६ महिन्याचा करार केला जाईल. कराराचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही.
- जिल्हा माहिती अधिकारी शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व निर्देशन (जीळशपींरींळेप) करतील.

ङ जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, (कौशल्य विकास रोजगार) व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून पाठवतील.

''मुख्यमंत्री योजनादूत'' या कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना सोपविण्यात येणारे कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. सबब या नेमणूकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही, याबाबतचे हमीपत्र निवड झालेल्या उम ेदवारांकडून घेण्यात येणार आहे.

निवड झालेल्या योजनादूताने करावयाची कामे:-

- योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील.
- प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.
- योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करताना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील.
- योजनादूत दर दिवशी त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल तयार करुन तो ऑनलाईन अपलोड करतील.
- योजनादूत त्यांना सोपविलेल्या जबाबदारीचा स्वत:च्या स्वार्थासाठीनियमबाह्य कामासाठी उपयोग करणार नाहीत, तसेच ते गुन्हेगारी स्वरुपाचेगैरवर्तन करणार नाहीत. योजनादूत तसे करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येवून त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल.
- योजनादूत अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.




उपसंचालक (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांची जबाबदारी:-

- विभागीय स्तरावर विभागीय संचालक उपसंचालक (माहिती) या योजनेचे सनियंत्रण करतील.
- जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा विभागीय स्तरावर घेतला जाईल.
- जिल्हा माहिती अधिकारी हे या योजनेसाठी संबंधित जिल्हयाचे नोडल ऑफिसर असतील.
- संबंधित जिल्हयातील योजनादूतांनी विहित नमुन्यात ऑनलाईन अपलोड केलेल्या त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा आढावा जिल्हा माहिती अधिकारी घेतील तसेच, संबंधित योजनादूतांना त्यांच्या काम काजामध्ये मार्गदर्शन करतील.

माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयातील उपसंचालक (वृत्त) यांची नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी :-

- मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम ाशी संबंधित कामकाजाचे समन्वयन करतील,
- प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी उपसंचालक यांच्याकडून दैनंदिन आढावा घेतील.
- प्रत्येक जिल्ह्याने मुख्यालयाला साप्ताहिक अहवाल पाठविल्यानंतर त्याचे विषण करतील.
- योजनादूत कार्यक्रमाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या बाह्यसंस्थेकडून अहवाल तयार करून घेतील. त्यानुसार राज्यातील कोणत्या जिल्ह्याचे काम समाधानकारक आहे अथवा नाही, हे तपासून त्याचा अहवाल तयार करतील.
- योजनादूतांची निवड, समुपदेशन व निर्देशन आणि उद्दिष्टाप्रमाणे काम काज केल्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतील.
- योजनादूतांना त्यांचे मासिक मानधन विहित वेळेत अदा होते किंवा कसे याबाबत आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता आयुक्तालय यांच्याकडे समन्वय साधून खातरजमा करतील व याबाबत काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करतील.

योजनादूत कार्यक्रमाच्या संचलनासाठी बाह्यसंस्थांमार्फत करावयाची कामे:-

- उमेदवारांची ऑनलाईन नोंदणी करणे.
- उमेदवारांच्या प्राप्त अर्जाची तसेच, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची छाननी करणे व पात्र उम ेदवारांच्या नावांची यादी जिल्हा माहिती अधिकारी यांना ऑनलाईन उपलब्ध करुन देणे.
- निवडण्यात आलेले योजनादूत यांना जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने समुपदेशन व निर्देशन (जीळशपींरींळेप), कामकाजाचे वाटप इ. बाबतीत सनियंत्रण करणे.
- योजनादूतांना कामाचे वाटप झाल्यानंतर त्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबतचा (हजेरी) ऑनलाईन पद्धतीने अहवाल घेणे. मुख्यालय स्तरावरील उपसंचालक (वृत्त) (नोडल ऑफीसर) यांना याबाबत आवश्यक असेल तेव्हा माहिती देणे. तसेच, उपस्थितीबाबतचा व अन्य बाबींचा साप्ताहिक अहवाल त्यांना सादर करणे.

ङ योजनादूतांनी प्रत्येक दिवशी केलेल्या कामाचा ऑनलाईन अहवाल घेणे. त्यानंतर हा अहवाल जिल्हा माहिती अधिकारी व नोडल ऑफिसर, माहिती जनसंपर्क महासंचालनालय यांना पाठविणे.

ङ योजनादूतांच्या मानधनाची देयके तयार करुन जिल्हा माहिती अधिकारी यांना सादर करणे. त्याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय बाबी सादर करणे.

मुख्यमंत्री योजनादूतांना दयावयाचे मानधन व त्याकरिता करावयाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीबाबत :-

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ५० हजार योजनादूतांकरिता प्रति महिना रुपये १० हजार याप्रमाणे ६ महिन्याकरीता अंदाजे रुपये ३०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. दि. ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे योजनादूतांच्या मानधनावरील खर्च कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत योजनादूतांची निवड, समुपदेशन व निर्देशन (धीगहूरूदह) व त्यांनी उद्दिष्टाप्रमाणे कामकाज केल्याबाबत संपूर्ण खातरजमा करण्याची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची राहिल. तद्नंतरच योजनादूतांना मासिक मानधन अदा केले जाईल.

संबंधित उमेदवारांचे मानधन आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांच्यामार्फत दि.९ जुलै २०२४ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे त्वरीत अदा करण्यात येईल. ही कार्यवाही प्रत्येक म हिन्याच्या २ तारखेपर्यत पूर्ण करण्यात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८०७१८३२०८४८०७ असा आहे.

जिल्ह्यातील होतकरु व गरजू पात्र उमेदवारांनी या योजनेचा जरुर लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून तसेच जिल्हा माहिती कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### डोंबिवलीकरांचे ग्रामदैवत असलेल्या श्री गणेश मंदिर संस्थान सार्वजनिक गणेश मंडळाचे शताब्दी महोत्सव वर्ष साजरं



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** :महाराष्ट्राची सांस्कृतिक उपराजधानी असलेल्या डोंबिवली शहरातील पहिले सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ अशी ख्याती असलेल्या या गणेशोत्सवाची सुरुवात श्री गणेश मंदिर संस्थानात सन १९२५ पासून झाली. स्थापनेच्या काळात मंडळातील अनेक कार्यकर्ते हे वारकरी संप्रदायाचे असल्याने श्रींचे विसर्जन हे भागवत एकादशीला करण्याची प्रथा आजही सुरू आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जसजशी लोक वस्ती वाढत गेली शहराचा विस्तार झाला परंतु मंडळातील कार्यकर्त्यांचा उत्साह डोंबिवलीकरांची श्रद्धा व प्रेम कधीच कमी झालेल नाही. किंबहुना वाढतच गेले. शंभर वर्षाच्या काळात मंडळाने डोंबिवली शहराच्या सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक विकास कार्यात नेहमीच पुढाकार घेऊन आपले योगदान दिले आहे.

सात सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मंडळाचा १०० वा गणेशोत्सव मोठ्या दिमाखात धार्मिक आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्याचा मंडळाचा मानस आहे या शतक महोत्सवी उत्सवात आणि त्या निमित्ताने आयोजित सर्व धार्मिक सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमात सर्वांनी उपस्थित राहून तन-मन धनाने कामं केली. आहेत पदाधिकारी कार्यकर्ते, सजावट कार सर्वांनीच आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत

### ओला दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत द्या ; पातुर तालुक्यातील शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन





दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** गेल्या काही दिवसापासून पातुर तालुक्यात सतत पाऊस सुरू असल्याने पिकांच्या मुळा खराब होऊन पिके पूर्ण सडलेले आहे. व सोयाबीनचे झाडांना शेंगा खूप कमी आहे. शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही बँक व सावकाराकडून कर्ज काढून विविध पिकांची पेरणी केली, परंतु पिकांच्या पेरणीवर लावलेला खर्चही निघत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणीसाठी शेतकरी राजा ग्रुप यांच्या नेतृत्वात पातुर तालुक्यातील चान्नी मळसुर, बेलुरा, सुकळी आदी गावातील शेकडो शेतकऱ्यांनी ४ सप्टेंबर रोजी पातुरचे तहसील कार्यालयावर धाव घेऊन तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

### ५० कोटींच्या 'स्त्री २' ने कमावले ५०० कोटी, सनी देओलचा हा विक्रम निघाला मोडीत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : स्त्री २ चे यश बॉक्स ऑफिसवर कायम असल्याचे दिसत आहे. श्रद्धा कपूर आणि राजकुमार राव यांचा 'ओ स्त्री कल आना' ते 'ओ स्त्री रक्षा करना' पर्यंतचा प्रवास खूप छान झाला आहे. 'स्त्री २'च्या भीतीसमोर सलमान खान आणि शाहरुख खानचे अनेक मोठे चित्रपट अपयशी ठरले आहेत. रणबीर कपूरच्या 'ॲनिमल'पासून प्रभासच्या 'बाहुबली २' पर्यंत, 'स्त्री २' ने अनेकांना पराभूत केले आहे. आता या चित्रपटाने सनी देओलच्या 'गदर २'चाही मोठा विक्रम मोडीत काढला आहे.

ज्या दिवसापासून बॉक्स ऑफिसवर पाय ठेवला आहे, त्या दिवसापासून 'स्त्री २' ने आपली पकड मजबूत केली आहे. याच काळात अक्षय कुमारचा 'खेल खेल में' आणि जॉन अब्राहमचा 'वेदा'ही आले, पण 'स्त्री २'चे हे चित्रपटही काही नुकसान करू शकले नाहीत. पहिल्या दिवशी ५१ कोटींहून अधिक कमाई करून, 'स्त्री २' ने दिवसभरात बिग बजेट चित्रपटांना तारे दाखवले होते. ५० कोटी रुपयांमध्ये बनवलेला त्यांचा 'स्त्री २' भारतातील ५०० कोटींच्या क्लबमध्ये सामील होईल याचीही निर्मात्यांना कल्पना नव्हती. श्रद्धा कपूर, राजकुमार राव, पंकज त्रिपाठी, अपारशक्ती खुराना आणि अभिषेक बॅनर्जी यांच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळत आहे.'स्त्री २' रिलीज होऊन ३ आठवडे झाले आहेत. अमर कौशिश दिग्दर्शित या चित्रपटाने रिलीजच्या २२ व्या दिवशी सनी देओलच्या चित्रपटाला मागे टाकले आहे.

# 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.




महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

### पोर्शे अपघात प्रकरणात सुनील टिंगरे यांचा संबंध? पोलीस आयुक्तांची पत्रकार परिषदेत खळबळजनक माहिती

**पुणे/प्रतिनिधी** : कल्याणीनगर भागात भरधाव पोर्शे मोटारीने दिलेल्या अपघातात संगणक अभियंता तरुण-तरुणीचा मृत्यू झाला. अपघात प्रकरणात बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवालच्या मुलाला ताब्यात घेण्यात आले. अगरवालला मदत करण्यासाठी अनेकांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे मदत केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे यांची याप्रकरणात चौकशी करण्यात आली. टिंगरे यांचा अपघात प्रकरणाशी संबंध असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.कल्याणीनगर अपघात प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांनी योग्य पद्धतीने केला. पोलिसांच्या कार्यपद्धती, तसेच तपासाबाबत काहींनी शंका उपस्थित केली. समाज माध्यमात पोलिसांवर टीका करण्यात आली.

# नांदेड येथून १५ फुटाची गणेश मूर्ती 'मालेगावचा राजा' शिवराज मंडळासाठी रवाना

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगांव** : शहरातील गणेशोत्सवाच्या तयारीला उधाण आले असताना,नांदेड येथून १५ फूट उंचीची गणेश मूर्ती मालेगावच्या शिवराज गणेश मंडळासाठी विशेषरित्या तयार करून रवाना करण्यात आली आहे या भव्य मूर्तीची खासियत म्हणजे ती अत्यंत देखणी आणि आकर्षक स्वरूपात बनवली आहे,ज्यामुळे गणेश मंडळाच्या गणपतीसाठी यंदाच्या वर्षीची सजावट विशेष ठरणार आहे. मालेगावचा राजा या मंडळाने यावर्षी आपले स्थान पक्के करत,आणखी भव्य आणि आकर्षक उत्सव साजरा करण्याचा निर्धार केला आहे.

मूर्तीचे निर्माते आणि कलाकार नांदेडचे प्रसिद्ध मूर्तिकार आहेत,जे प्रत्येक वर्षी अशा प्रकारच्या कलाकुसरीच्या मूर्ती घडवण्यासाठी ओळखले जातात मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी



सांगितले की,मूर्तीच्या आगमनाने भक्तगणांमध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे ,मूर्तीचे पूजन करून पुढील तयारीला वेग देण्यात आला यावर्षी मंडळाने गणेशोत्सवाच्या वेळी सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे,ज्यात आरोग्य शिबिरे,रक्तदान शिबिरे आणि पर्यावरण संरक्षणाचे संदेश दिले जाणार आहेत मालेगावच्या गणेश भक्तांमध्ये या १५ फुटाच्या मूर्तीचे विशेष आकर्षण आहे.

### लिंबाच्या झाडापासून गोड फळांची अपेक्षा करुच नका, सुप्रिया सुळेंवर पडळकरांची शेलकी टीका

**मुंबई/प्रतिनिधी** : शरद पवार हे जातीयवादाचं विद्यापीठ आहे. सुप्रिया सुळे या लहानपणीपासून त्यांच्याकडूनच हे सगळं शिकल्या असल्याची जहरी टीका भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलीय. लिंबाच्या झाडापासून गोड फळांची अपेक्षा करुच नका. जसा बाप तशीच लेक असं म्हणत पडळकरांनी शरद पवारांसह सुप्रिया सुळेंवर जोरदार निशाणा साधला.

सुप्रिया सुळे या अजित पवार यांच्याबद्दल सहानुभूती दाखवू नका असं बोलतात. अजित पवार तिकडं लाडकी बहिण योजनेसाठी राज्यभरात फिरत आहेत. पण इथं सुप्रिया सुळे त्यांच्यातली 'किडकी बहिण' महाराष्ट्राला दाखवत असल्याचे गोपीचंद पडळकर म्हणाले. मनोज जरांगे पाटील, एकनाथ शिंदे आणि शरद पवार हे तिघही मराठा आहेत, म्हणून जरांगे शिंदेंबद्दल बोलायच नाही असं सुप्रिया सुळे बोलल्या असल्याचे पडळकर म्हणाले.

### गणेशोत्सवा आधी नवी मुंबईकरांसाठी सुखद धक्का!! पेंधर ते बेलापूर मार्गिकेवरील प्रवास दरात घट

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई लोकल ही मुंबईमध्ये प्रवासासाठी प्रथम क्रमांकावर मानली जाते तर दुसऱ्या क्रमांकावर बेस्ट आणि तिसऱ्या क्रमांकावर मेट्रो असं म्हणायला हरकत नाही. तर नवी मुंबईमध्ये देखील लोकल जास्त प्रमाणात वापरण्यात येते आणि त्यानंतर नवी मुंबई मेट्रो सेवेचा सुद्धा वापर केला जातो. या सर्व सार्वजनिक वाहतूक सेवांवर मुंबईकर आणि नवी मुंबईकरांचे जीवन अवलंबून आहे. सार्वजनिक वाहतुकीचे दर कमी-जास्त होणे प्रवाशांच्या खिशासाठी महत्त्वाचे ठरतात. सर्वच नवी मुंबईकरांसाठी एक दिलासादायक बातमी म्हणजे नवी मुंबई मेट्रोचे दर कमी करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे.

# नायगाव तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज नायगाव तालुक्यातील बरबडा आणि पाटोदा येथे भेट दिली. यावेळी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य बालाजीराव बच्चेवार, भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य श्रावण पाटील भिलवंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष जीवन पाटील घोगरे, माजी पंचायत समिती सदस्य बालाजीराव मुद्देवाड, प्रल्हादराव उमाटे, माधव माचनवाड, चंदू पाटील चव्हाण, गुरुनाथ पाटील शिंदे, राजेश तोडे, दत्ता पाटील देगावकर, आनंद शिंदे, बळवंत शिंदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे नायगाव तालुक्यातही खरीप पिकाला



मोठा फटका बसला आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास अतिवृष्टीने पुन्हा एकदा हिरावला आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी, कापूस या नगदी पिकांसह या भागातील बागायती शेतीलाही मोठा फटका बसला आहे. अशा परिस्थितीत हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी आणि अतिवृष्टीग्रस्त भागाच्या पाहण्याची माहिती शासन दरबारी कळविण्याच्या अनुषंगाने माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी आज बरबडा आणि पाटोदा येथे भेट दिली. या भेटीत त्यांनी शेतीच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याच्या अनुषंगाने आपले शासनाकडे प्रयत्न सुरू आहेत. अतिवृष्टीग्रस्त भागातील पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश पालक मंत्र्यांनी दिलेले आहेत. त्यामुळे सरसकट शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी. यासाठी आपले प्रयत्न असून शेतकऱ्यांनी धीर सोडू नये, असे आवाहन चिखलीकर यांनी यावेळी केले.

# भास्करराव काळे यांची जळगाव जिल्हा निरीक्षकपदी निवड



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** :जेष्ठ मार्गदर्शक श्री भास्करराव मामा काळे यांची श्री शरदचंद्र पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या जळगाव जिल्हा निरक्षक पदी निवड करण्यात आली आहे भास्करराव काळे यांना राजकीय अनुभव असून त्यांच्या अनुभवाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार साहेब यांच्या पक्षाला नक्कीच फायदा होईल व एक संघटन मजबूत होईल यावेळी राष्ट्रवादी युवक काँ प्रदेश सचिव पंकजदादा पळसकर जेष्ठ नेते डॉ श्री गजाननराव बाजड तालुका अध्यक्ष माधवराव शेवाळे तालुका कार्याध्यक्ष मुरलीधर पाटील जुनघरे तालुका सरचिटणीस अनंताभाऊ देशमुख तालुका उपाध्यक्ष गजानन पाटील शिंदे गजानन चतरकर यांची उपस्थिती होती

### अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा केंद्रीयमंत्री तथा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे त्वरित करावे व पंचनामे करतेवेळी विमा कंपनी कृषी विभाग आणि महसूल विभागअंतर्गत समन्वय साधून एकही बाधित शेतकरी नुकसानी पासून वंचित राहणार नाहीत त्याची खबरदारी घ्या असे निर्देश केंद्रीय मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

२ आणि ३ सप्टेंबरला बुलढाणा जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन कापूस तूर मुंग उडीद मका पिके उध्वस्त झाली आहेत तर अनेक गावे बाधित झाली आहेत बुलढाणा चिखली खामगाव नांदुरा शेगाव मोताळा मेहकर लोणार या तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाला आहे या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करावे पंचनामे करतेवेळी पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी कृषी विभाग आणि महसूल विभागाच्या अधिकारी कमर्चाऱ्यांमध्ये समन्वय साधून एकही बाधित शेतकरी नुकसानीच्या पंचनामेपासून वंचित राहणार नाही पंचनामे झाल्यानंतर एक प्रत शेतकऱ्यांना द्यावी या संदर्भातील नियोजन आपल्यास्तरावरून करावे असे निर्देश केंद्रीय मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

# कमी पाण्यात एकाचवेळी तिहेरी पिकांचा प्रयोग, शेतकऱ्याची यशस्वी शेती

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : शेतकरी शेतात सातत्याने नवनवीन प्रयोग करीत आहेत. या माध्यातून चांगले उत्पन्न घेत आहेत. असाच एक वेगळा प्रयोग पाचोरा तालुक्यातील कोल्हे येथील प्रगतिशील शेतकरी रमेश बाफना या शेतकऱ्यांनी केला आहे. या शेतकऱ्यांने आपल्या शेतात तिहेरी पिक पध्दतींचा अवलंब करून त्यांनी तो प्रयोग यशस्वीपणे पिकाची लागवड केली असून त्यातील मका हे पिक आता काढणीला आले आहे.



पीक चांगल्या अवस्थेत आहे व यातून चांगल्या उत्पादनाची आशा शेतकऱ्यांना आहे. कमीत कमी पाण्यात एकाच वेळी तिहेरी मिश्र पिके घेऊन भरघोस उत्पन्न मिळविण्याचा यशस्वी प्रयोग केला आहे.

रमेश बाफना यांनी आपल्या शेतात ठिबक सिंचनाचा वापर करून त्यांनी आपल्या एकर शेतीमध्ये एकाच वेळी तिहेरी पिक पध्दतींचा अवलंब करून त्यांनी मिश्र शेती करीत एकाच वेळी तिहेरी पिकांचे उत्पन्न घेण्याचा प्रयोग केला आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा तिहेरी पिकाला उपयोग करून पाण्याची बचत केली.या आगळावेगळा असा प्रयोग शेतकऱ्यांपुढे, आदर्श निर्माण केला आहे. प्रयोगशील शेती करून रमेश बाफना यांनी रासायनिक खताला तिलांजली दिली.

सेंद्रिय खते व शेणखताचा शंभर टक्के वापर करून मिश्र पिके घेत अधिकचे उत्पन्न मिळविता येते. यामुळे शेतीही नफ्यात आली. सेंद्रिय खते व ठिबक सिंचनावर मिश्र पिके घेऊन अधिक उत्पन्न घेतल्याने शेती नफ्यात असल्याची माहिती त्यांनी दिली. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग केला, यामुळे वेळ आणि पैशांची बचत झाली. यातून भरघोस उत्पन्न मिळाले.

यामध्ये मका, सुबाभुळ, तुर, या पिकांची निवड केली आहे. शेतात तिहेरी पिकांचे नियोजन करुन एकाच वेळी तिन्ही पिकांचे उत्पादन खर्च कमी करून त्यांनी भरघोस उत्पन्न घेण्याचा मार्ग निवडला असुन तो त्यांनी यशस्वीरीत्या करत आहेत. तिहेरी पिका पैकी आता मका या पिकांचे उत्पादन हाती येणार आहे. त्यांनतर तुर व शेवटी सुबाभुळ चे उत्पादन मिळणार आहे. तिहेरी पिकांचे नियोजन करुन टप्प्याटप्प्याने उत्पन्न शेतकरी रमेश बाफना हे घेणार आहेत त्यामुळे त्यांच्या या प्रयोगाची चर्चा सुरू आहे.

# अधिकारी चर्चेला आणि कृषीमंत्री मुंडेंचाही आला फोन

## तोंडी आश्वासनांना आम्ही शेतकरी कंटाळलो आता रिझल्ट द्या, तुपकरांची आग्रही मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे.. त्यांची प्रकृती खालावल्यामुळे डॉक्टरांनी तपासणी करुन अन्नत्याग मागे घेण्याचा सल्ला दिला आहे.दरम्यान सायंकाळी उपविभागीय अधिकारी, कृषी अधिकारी व प्रशासनातील इतर अधिकारी देखील चर्चे साठी आंदोलनस्थळी दाखल झाले होते. या चर्चेदरम्यान त्यांनी आंदोलन मागे घेण्याची विनंती केली तर ही चर्चा सुरु असतांनाच राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचाही फोन आला. त्यांनीही तुपकरांशी फोनवरुन चर्चा केली आणि आंदोलन मागे घेण्याची विनंती केली परंतु आम्हाला तोंडी आश्र्वासन नको, मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय झाल्याशिवाय अन्नत्याग सोडणार नाही, असे सांगत रविकांत तुपकरांनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला आहे.






# खामगावात गणेश विसर्जन मिरवणुकीचा काढला लकी ड्रॉ

## लकी ड्रॉ प्रमाणेच विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी होता येणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात मोठ्या उत्साहात गणेश उत्सव साजरा करण्यात येतो. यामध्ये विसर्जन मिरवणुकीच्या रांगेत एकूण २९ मंडळे सहभागी होत असतात. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा लकी ड्रॉ नुसार विसर्जन मिरवणूक पार पडणार आहे. यंदा गणेशोत्सव ७ सप्टेंबर पासून सुरू होत असून १८ सप्टेंबर अनंत चतुर्दशीला शहरातून गणेश विसर्जन मिरवणूक निघणार आहे.



दरवर्षीप्रमाणे मिरवणुकीच्या सर्वप्रथम मानाचा लाकडी गणपती, तानाजी गणेश मंडळ, हनुमान गणेश मंडळ, व राणा गणेश मंडळानंतरच लकी ड्रॉ प्रमाणे काढण्यात आलेले नंबर विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी होतात. यामध्ये शिवाजी नगर पोलिस स्टेशन अंतर्गत १२ तर शहर पोलीस स्टेशन अंतर्गत १७ अशा एकूण २९ गणेश मंडळांचा समावेश राहणार आहे. या अनुषंगाने जाहीर केल्याप्रमाणे आज शहर पोलिस स्टेशनच्या प्रांगणात



एएसपी अशोक थोरात, डी वाय एस पी विनोद ठाकरे, शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामकृष्ण पवार,शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे ठाणेदार पितांबर जाधव व गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सुहानी महेंद्र बनसोड या चुमिकलीच्या हस्ते चिठ्ठ्या उघडुन लकी ड्रॉ काढून मंडळाची क्रमवारी जाहीर करण्यात आली. कोणीही अफवांवर विश्र्वास ठेवू नये व सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकू नये, डीजे कोणीही लावू नये व लेझर बीम आढळून आल्यास संबंधित मंडळ व वाहन धारकावर कारवाई करण्यात येईल अशी माहिती अप्परपोलीसअधीक्षक अशोक थोरात यांनी दिली आहे.

# रोजगार निर्मितीतून युवकांना बळ देण्याचे मुख्यमंत्र्यांचे ध्येय - आ. संजय रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : राज्याच्या इतिहासात सामान्य माणसांच्या हितासाठी मोठ्या प्रमाणावर योजनांची अंमलबजावणी करणारे एकनाथ शिंदे हे एकमेव मुख्यमंत्री असून रोजगार निर्मितीतून युवाशक्तीला बळ बळ देणे हे मुख्यमंत्र्यांचे ध्येय आहे , असे विचार मेहकर चे आमदार संजय रामुलकर यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत मेहकर तालुक्यातील ११० युवकांना ८ ते १० हजार रुपये प्रतीमाह मानधनावर नियुक्तीपत्रे आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. स्थानिक नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात हा सोहळा पार पडला. उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, गटविकास अधिकारी आर. बी .पांढरे , सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष अरुण दळवी,दुर्गादास रहाटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला चक्रधर स्वामींच्या प्रतिमेचे पूजन रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत विस्तार अधिकारी शिवाजी गवई, शिवाजी पंडागळे यांनी केले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात प्रभारी गटविकास अधिकारी संदीप मेटांगळे म्हणाले की, महास्वयम पोर्टलवर नोंदणी केलेल्या बेरोजगार ११० युवकांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण देऊन ग्रामपंचायत सहाय्यक ऑपरेटर पदावर सहा महिन्यासाठी नियुक्ती देण्यात आल्या आहेत. त्यांना मिळणाऱ्या मानधनाची रक्कम त्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. त्यांना अनुभवाचे प्रमाणपत्र हे देण्यात येणार आहे.

आपल्या भाषणात आमदार रायमुलकर पुढे म्हणाले की, मेहकर तालुक्यातील एक लाख सात हजार मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे अर्ज मंजूर करण्यात आले असून त्यांना आता दरमहा पंधराशे रुपये मिळणार आहेत.

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या सहकार्याने मेहकर विधानसभा मतदारसंघात जवळपास ४ हजार कोटींची विकास कामे करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी एनडीआरएफ चे निकष बदलणारे मुख्यमंत्री शिंदे हे एकमेव आहेत. एक रुपयात पिक विमा भरता येतो, त्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांनाही पीक विम्याचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे.

प्रधानमंत्री व मुख्यमंत्री किसान योजनेमुळे शेतकऱ्यांच्या खात्यात भरीव रक्कम आलेली आहे. शेतकरी, कामगार, युवावर्ग ,विद्यार्थिनी आणि महिलांसाठी महायुती सरकारने मोठ्या प्रमाणात योजना आणल्या त्याचा लाभ सर्वांना होत आहे. आज नियुक्तीपत्रे दिलेल्या युवकांनी ग्रामीण भागातील नागरिकांची मनापासून सेवा करावी व शासनाच्या योजनांची माहिती तळागाळातल्या घटकांना द्यावी , असे आवाहनही आमदार संजय रायमुलकर यांनी केले.

यावेळी माधुरी राठोड अनुजा चव्हाण कोमल कुराडे अजय कोरडे संत संदेश मोगल दीपक निकम युवराज पवार गणेश मोरे दिव्या राठोड विजय राठोड विकास खडसे सोनल जाधव ज्ञानेश्र्वर कंकाळ आदींसह ११० युवक युवतीना नियुक्तीपत्रे रायमुलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

# रविकांत तुपकर यांची प्रकृती खालावल्याने शेतकऱ्यांनी आक्रमक होत केला रास्तारोको

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पांठिबा म्हणुन आज डॉ ज्ञानेश्वर टाले यांच्या नेतृत्वामध्ये छत्रपती शिवाजी नगर नागपूर राज्य महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले आंदोलकर्त्यांना पोलिसांनी घेतले ताब्यांत

राज्याचे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांच्या राजवाडा समोर सिंदखेड राजा येथे शेतकऱ्यांच्या विविध मागण्याच्या अनुषंगाने अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे.मात्र






राज्य सरकार वा जिल्हा प्रशासन अजूनही शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करतांनाही बाब अतिशय गंभीर असून राज्यांमध्ये ठिकठिकाणी विविध स्वरूपाचे आंदोलने आज झाले असून राज्यभरात शेतकरी आक्रमक झाले आहेत व गावागावात प्रभात फेऱ्या काढण्यात आल्या गावागावातून ग्रामसभेचे ठराव घेण्यात आले की शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळावी शेतकऱ्यांच्या कापूस सोयाबीनला दरवाढ मिळावी तसेच जंगली जनावरांच्या शेतीच्या संरक्षणासाठी मजबूत कंपाऊंड मिळावे जिल्हात ढगफुटीमुळे झालेल्या शेती पिकाची नुकसान भरपाई तात्काळ मिळावी तसेच सरसकट पीक विमा मिळावा अशा विविध मागण्यांच्या अनुषंगाने सदर अन्नत्याग आंदोलन चालू असून आंदोलनाचा तिसरा दिवस असून रविकांत तुपकर यांची तब्येत खालवत चालली असून त्यांची शुगर कमी झालेली आहे असं डॉक्टरांचा अहवाल आलेला आहे, मात्र जिल्हा प्रशासन अद्याप देखील राज्य सरकारला गंभीर रित्या या आंदोलनाची दखल घेण्यास कळवत नसल्यामुळे ठिकठिकाणी गावागावात प्रभात फेऱ्या काढून रस्त्यावर उतरून टावरवर चढून रस्ता रोको करत वेगवेगळ्या गांधीगिरी मार्गाने आंदोलन सुरू असून राज्य सरकारचा निषेध करण्यासाठी गावागावात सरकार च्या विरोधात घोषणा देऊन आज आंदोलन झाले यामध्ये डोणगांव येथे रास्ता रोको करण्यात आला तसेच परिसरातील आरेगाव गोहगाव बेलगाव आंधृड या विविध गावांमध्ये आज आंदोलन करण्यात आले सरकारने अन्नत्याग आंदोलनाची तात्काळ दखल घ्यावी. अन्यथा शेतकरी रस्त्यावर ऊतरुन आक्रमकपणे आंदोलन करतील व कायदा सुव्यस्थेचा प्रश्र्न निर्माण झाल्यास शासन जबादार असेल.असा इशारा डा.ज्ञानेश्र्वर टाले.शेतकरी नेते.यांनी दिला.

## वृत्तविशेष...

### सोनगीर फाटा परिसरात कंटेनरसह लाखोंचा गुटखा जप्त, सोनगीर पोलिसांची दमदार कामगिरी




दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : सोनगीर पोलिसांनी एका मोठ्या कारवाईत प्रतिबंधित गुटखा व पान मसाला जप्त करून दोन आरोपींना अटक केली आहे. सोनगीर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, शिरपूरकडून मुंबईकडे जात असलेल्या एका कंटेनरमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा भरून आणला जात होता. पोलिसांनी सोनगीर फाट्यावर सापळा लावून कंटेनरची तपासणी केली असता कंटेनर मध्ये लाखोंच्या गुटखा पोलिसांना आढळून आला. कंटेनरसह या मुद्देमालाची किंमत २६ लाख ८१ हजार ४४० रुपये इतकी आहे.

सोनगीर पोलिसांनी कंटेनर चालक महंमद समीम इददुखान आणि त्याचा साथीदार पवन जयभगवान शर्मा यांना अटक केली आहे. पोलिसांनी या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### विधुत तार चोरी करणारे स्थानिक गुन्हे शाखाच्या जाळ्यात



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी** : वाशिम ग्रामिण हद्दितील आडोळी ते वाळकी मांझरे एकुण ३५ पोल वरिल १८० मिटर विद्युत तार चोरीस गेली. अप क ३५५/२४ कलम १३६ भारतीय विद्युत अधिनियम नुसार गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयांचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असताना गोपनिय माहिती आरोपी बाबत माहिती मिळाली की, गुरुवारी (दि.५) चोरी केलेली अल्युमिनीयम तार बोलेरो पिकअप मधून वाशिम येथुन बाहेर गावी घेवून जात आहेत. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने सापळा रचत सदरचे वाहन ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलिसांनी शेख हक्कीम शेख मुनाफ (वय. ४०, रा. घरकुल, जि. वाशिम), हिवरखेड येथील रहिवासी (ता. खामगाव जि. बुलढाणा) दशदथ अशोक अडागळे (वय. ३६), विजय बंडु बघे (वय. २६) आणि विक्रांत प्रशांत वाकोडे (वय. २४) यांना ताब्यात घेतले.

### रुम्हणा येथे मोफत सायकल वाटप




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**दुसरबिड** : कै. तुकाराम कायंदे विद्यालय रुम्हणा येथे मानव विकास योजने अंतर्गत मोफत सायकल वाटप योजने अंतर्गत २५ सायकल वाटप करण्यात आल्या यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ मंडळ रूम्हणा या संस्थेच्या संचालीका प्रा. सौ धनश्री कायंदे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच बेबी जायभाये, रूपाली जायभाये, संध्या कायंदे, लता कायंदे , मालता काळे, अर्चना आघाव, नीता डोळे प्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते

### सुरक्षित व, आनंददायी प्रवासासाठी कोकण रेल्वे सज्ज!

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : प्रवाशांसाठी सुरक्षित आणि आनंददायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी कोकण रेल्वेने गणेशोत्सवनिमित्त अनेक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्यानुसार वाढत्या प्रवासी वाहतुकीला सामावून घेण्यासाठी कोकण रेल्वे मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे आणि दक्षिण रेल्वेच्या समन्वयाने ३१० विशेष ट्रेन फेऱ्या चालवणार असल्याचा निर्णय घेतला आहे.

या विशेष गाड्या उधना, विश्वामित्री, सुरत, अहम दाबाद, मुंबई सेंट्रल, मुंबई सीएसएमटी, लोकमान्य टिळक (टी), वांद्रे, पनवेल ते रत्नागिरी, कुडाळ, सावंतवाडी रोड, मडगाव, सुरत, ठोकूर आणि मंगळुरू या मार्गावर चालतील.

माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी या स्थानकांवर राज्य आरोग्य प्राधिकरणांच्या समन्वयाने प्रथमोपचार चौक्या उभारण्यासह प्रवाशांची सुरक्षितता आणि सोई सुनिश्चित करण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. १६सप्टेंबर २०२४ पर्यत प्रथमोपचार पोस्ट २४ तास पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांकडून कार्यरत असतील.



### बडनेरा रेल्वे उड्डाणपुलाची खासदार बळवंत वानखडे यांनी केली पाहणी



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : अकोला ते यवतमाळ मार्गाला जोडणाऱ्या बडनेरा येथील रेल्वे उड्डाणपुलावर डांबरी रस्त्याला भली मोठी भेग पडल्याने कोणत्याही क्षणी पुलाचा एक भाग कोसळू शकतो त्यामुळे खासदार बळवंत वानखडे यांनी तातडीने महारेल सह रेल्वे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी या पुलावरील वाहतूक धोकादायक ठरू शकते त्यामुळे या पुलावरील वर्दळ दुसऱ्या ठिकाणी वळवा अशा सूचना खासदार बळवंत वानखडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत तर तातडीने या पुलाची दुरुस्ती करा अशा सूचना खासदार बळवंत वानखडे यांनी दिल्या आहेत.

### अटल सेतूवरुन उडी मारुन बँकरनं संपवलं जीवन ; कामाच्या तणावातून आत्महत्या केल्याचा कुटुंबीयांचा आरोप

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल सेतूवरुन आत्महत्या करण्याचं सत्र दिवसागणिक वाढत आहे. नुकतंच न्हावा शेवा पोलिसांनी एका महिलेला अटल सेतुवरुन आत्महत्या करत असताना वाचवल्याची घटना ताजी आहे. त्यातच आता पुन्हा एकदा पिंपरीच्या बँकरनं अटल सेतूवरुन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मात्र या बँकरनं कामाच्या तणावातून आत्महत्या केल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. ॲलेक्स रेगी असं अटल सेतूवरुन आत्महत्या करणाऱ्या बँकरचं नाव आहे.

काय आहे प्रकरण : ॲलेक्स रेगी (३५) हा तरुण पुण्यातील पिंपरी इथं राहणारा होता. तो पुण्यातील एका बँकेत कार्यरत होता. कामाच्या बैठकीसाठी ॲलेक्स रेगी हा पिंपरीहुन मुंबईत आला होता. त्यानं मुंबईतील चेंबूर इथं राहणाऱ्या त्याच्या सासऱ्याचीही भेट घेतली. त्यानंतर पिंपरी इथल्या घरी निघत असताना त्यानं अटल सेतूवरून उडी मारुन आत्महत्या केली.

अटल सेतू मार्गे आपल्या घरी पिंपरी इथं जात असतानाच ॲलेक्स यानं अटल सेतूवर त्याची कार थांबवली. सीसीटीव्हीम ध्ये कार थांबल्याचं पाहून यंत्रणेनं पोलिसांना सूचना दिली.